# जिल्हा व सत्र न्यायालय – जळगांव.

## जा ही र नि वि दा.

जळगांव जिल्हयातील तमाम कार्यालयीन उपयोगाचे संगणक प्रिंटरर्सचे टोनर पुरविणा–या पुरवठाकारांना या जाहीर निविदेद्वारे कळविण्यांत येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कार्यालयाच्या उपयोगाकरीता लागणारे संगणक प्रिंटरर्सचे टोनर खरेदी करावयाचे आहेत. तरी याकामी ज्या पुरवठाकारांना स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद लिफाफयात म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने पाकिटावर "संगणक प्रिंटरर्सचे टोनर" असे नमुद करुन पाकीटे प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कक्ष कमांक 101 मध्ये दिनांक 13/08/2024 पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून दयावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक 14/08/2024 रोजी म. जिल्हा व सत्र न्यायाधीश. 1, जळगांव यांचे निजी कक्षात उघडले जातील.

कार्यालयीन उपयोगाकरीता लागणारे संगणक प्रिंटरर्सचे टोनर खालील प्रमाणे उधारीवर खरेदी करावयाची आहेत.

| तपशील | जिल्हा न्यायालयाचा शिल्लकी साठा | आवश्यक टोनर |
|---|---|---|
| HP Laser Jet Pro P1566 (78A)<br>HP Laser Jet Pro P 1606dn(78A) | 42 | 10 |
| Laser JetPro M202dw (88A) | 19 | 25 |
| Canon LBP151 dw Laser Printer चे (Cartridege 337) | 07 | 150 |
| Kyocera ECOSYS M2040DN Laser Printer (TK-1178) | 105 | 20 |
| Canon LBP 161 dn Laser Printer required tonner (051) with drum unit | 03 | 10 |

## सर्वसाधारण अटी.

1. दरपत्रक स्विकृत केल्यावर आदेश दिल्यानंतर सदरचे साहित्य त्वरीत पुरवावे. सदरील साहित्याचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा **Genuine (Original)** असावा नसल्यास स्विकाराला जाणार नाही.
2. सदरचे साहित्य कार्यालयीन वेळेत कार्यालयात स्वखर्चाने पोहोचवून दिले पाहिजे.
3. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यांत आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.
4. सदरील साहित्य जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कार्यालयात पोहोचवून दिलेवर उधारीचे देयक तीन प्रतीत सादर करावे.

5. दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटी टॅक्सचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस आधीन राहून दरपत्रक दयावे लागेल. तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यांत येईल.

6. उपरोक्त साहित्य अनुदानाअभावी कमी जास्त प्रमाणात खरेदी करण्याचे अधिकार म. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जळगांव यांच्या कडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत. तसेच उपरोक्त वस्तु उधारीवर खरेदी करावयाचे आहेत. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यांत येईल.

7. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा–यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.

8. दरपत्रकातील दर दिनांक 31.12.2024 अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरविली जातील त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट करावा.

9. नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

म.जा.क. /८१५२/2024
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक. 31/07/2024.

प्र.प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव

प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.

1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा व सत्र न्यायालयाच्या संकेतस्थळावर.